
विक्रम आणि वेताळ
मोहन रावळ
परी प्रकाशन

**विक्रम आणि वेताळ**

◆ ————————

© सुरक्षित

◆ ————————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ————————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ————————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ————————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ————————

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

१. वेताळाची भेट ............... ३
२. शापित मूर्ती ................. ११
३. चोराला केला जावई ......... २३
४. वचन दिले तू मला ! .......... ३१
५. चूक कोणाची ? ............. ४०
६. श्रेष्ठ कोण ? ................. ४८
७. लोभी धनदत्त ............... ५६
८. धूम्रकेतूचा डाव .............. ६१
९. भुतानं केली नकटी .......... ७२
१०. सत्याला मरण नसते ......... ७७
११. तारामतीचा पती कोण ? ..... ९१
१२. खरा मित्र .................... ९६
१३. फसगत जन्माची ............. ११४
१४. सगळेच चोर ................ १२०
१५. पाप आणि पुण्य ............. १२७
१६. कंटकनाथाचा कावा ........ १३१
१७. राक्षशिणीचा न्याय ........... १४३
१८. दैव देतं, कर्म नेतं ............ १४९
१९. अति तेथे माती .............. १५५
२०. चोराची साक्ष ................ १६१
२१. पाषाण मूर्ती ................. १६७
२२. मंजिरी ...................... १७७



# वेताळाची भेट

राजस्थान प्रांताचा काही भाग वाळवंटाचा, बिकट व निर्मनुष्य असला तरी, त्या दिशेने धारा नगरीवर कोण्या शत्रूचा हल्ला होण्याची शक्यता नव्हतीच. दिवसा प्रचंड तापमान व रात्री कमालीची थंडी असा तो वाळवंटी प्रदेश होता. तेथे वाळूची वादळं होत. इथली वाळूची टेकडी वाऱ्याबरोबर दुसरीकडे जाई. वाळूचे कण वारा वाहून नेई, त्याचीच चक्रीवादळं बनत आणि त्या गरगरणाऱ्या वाळूच्या भोवऱ्यात एखादी टेकडी येई आणि पाहता पाहता सपाट मैदानावर वाळूची टेकडी उभी राही. किंवा वाळूच्या टेकडीचे सपाट मैदान बने. अशा विचित्र नैसर्गिक प्रदेशात तेथे माणूस जाणे शक्यच नसे. म्हणूनच धारानगरीचे संरक्षण करायला ते वाळवंट उपयोगाचे होते.

धारानगरीच्या दुसऱ्या बाजूला मात्र अनेक छोटी–मोठी राज्ये होती. त्यांच्यात नेहमीच वाद उभे रहात व लढाया होत; पण धारानगरीकडे कोणाची वक्रदृष्टी नसे. इथला राजा गंधर्वसेन हा शूर, प्रजाहितदक्ष, धोरणी व कलाकारांची कदर करणारा होता.

यथावकाश वृद्ध होऊन गंधर्वसेन मृत्यू पावला व त्याचा मोठा मुलगा शंखसेन हा गादीवर बसला. शंखसेन लोभी, प्रजेचा घात करणारा व कसलेच धोरण नसलेला ऐदी, ऐयाश अशा स्वभावाचा होता. त्याच्याबद्दलच्या तक्रारी शंखसेनचा धाकटा सावत्र भाऊ विक्रमादित्य याच्या कानावर येऊ लागल्या. खरं तर विक्रम राजाला राज्यकारभारात सिंहासनाबद्दल ओढच नव्हती. तो विद्याभ्यास, शस्त्राभ्यास व योग यातच मश्गुल असे.

पण शंखसेन आपल्याच जनतेवर अत्याचार करतो आहे व आपल्या पिताश्रींची कीर्ती धुळीत मिसळतो आहे हे सहन न होऊन अधर्मनीती आचरणाऱ्या शंखसेन या आपल्या

भावाचा विक्रमादित्याने वध केला व भृर्तहरीला राज्य सिंहासनावर बसवले. निर्लोभी विक्रमादित्याबद्दल सर्वच राज्यांच्या राजांना आदर वाटू लागला. भृर्तहरीला राजेपद देऊन विक्रमराजा कैलास पर्वतावर गेला. तेथे त्याने योगाभ्यास सुरू केला. त्याला एका साधूने योग शिकवण्याची तयारी दर्शवली.

इकडे धारानगरीच्या सिंहासनावर बसलेला भृर्तहरीचा राज्यकारभारही उत्तम चालला होता. त्याचे आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम होते. तसेच आपल्या पत्नीबद्दलही त्याला आदर होता. भृर्तहरी राजा असल्याने त्याच्याकडे राजनर्तिका होत्या. पण असे छंद त्याला आवडत नसत. भृर्तहरी एकवचनी एक पत्नी असला तरी एक राजनर्तिका त्याच्यावर मनोभावे प्रेम करत होती.

धारानगरीमधील देवीच्या मंदिरात एक ब्राह्मण घोर तपस्या करीत होता. त्याला देवी प्रसन्न झाली व तिने एक अमृताचे फळ त्याला देत म्हटले, 'हे यतीदेवा, मी तुझ्या तपस्येने संतुष्ट झाले आहे. हे अमृत फळ तू सेवन कर. याने तुला वार्धक्य येणार नाही. तू अमर होशील.'

तो ब्राह्मण ते फळ घेऊन आपल्या घरी आला व आपल्या अर्धांगिनीला म्हणाला, 'माझ्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन देवीने हे अमृताचे फळ दिले आहे. देवी म्हणाली, हे फळ जो खाईल तो वृद्ध होणार नाही. शिवाय अमर होईल.'



पत्नी म्हणाली, 'या फळाचा आपल्याला काही उपयोग नाही. तुम्ही हे फळ भृर्तहरी राजांना नेऊन द्या. ते जे धन देतील, ते आपल्याला चरितार्थासाठी उपयोगाचे होईल. आपले जीवन सुखाचे जाईल. आपण भिक्षा मागायचे सोडून देऊ.'

पत्नीचे ऐकून ब्राह्मण भृर्तहरी राजाकडे गेला; आणि ते अमृताचे फळ राजाला देत म्हणाला, ''राजन्, हे माझ्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन देवीने दिलेले फळ आहे. याचे सेवन जो

करेल तो वृद्ध होणार नाही, अमर होईल. या फळापेक्षा मला संसारासाठी धनाची गरज आहे. हे फळ तू घे आणि अमर होऊन सुखाने राज्य कर.'' भृर्तहरीने ते अमृतफळ एक लाख मोहरा ब्राह्मणाला देऊन स्वत:कडे घेतले. ब्राह्मण मोहरा घेऊन आनंदाने निघून गेला.

भृर्तहरी लाडक्या राणीच्या महालात आला व अमृतफळ राणीला देत म्हणाला, ''हे प्रिये, हे अमृतफळ आहे. जो सेवन करतो तो वृद्ध होत नाही. तू हे फळ खा आणि अजरामर हो.'' राणीने भृर्तहरीकडून फळ घेतले व ठेवून दिले. ती म्हणाली, ''देवपूजा करते मग फळ सेवन करून तुम्हाला सांगते.''

''ठीक आहे.'' म्हणत राजा भृर्तहरी दरबारात गेला.

इकडे राणीने आपला प्रियकर जो नगराचा कोतवाल होता, त्याला बोलावून घेतले व म्हणाली, ''प्रियकरा, तू कायम तरुण व सुंदर राहावास या हेतूने मी अमृतफळ मिळवले आहे. ते तू खा आणि अमर हो.''


कोतवालाने राणीकडून फळ घेतले व म्हणाला, ''दिवसभर व्याप खूप आहेत. रात्री भोजनानंतर निवांत हे फळ खातो व वृत्तांत द्यायला येतो.'' कोतवालाने ते फळ घेतले व डोक्यावरच्या टोपीत लपवले आणि तो राणीच्या महालातून बाहेर पडला. परंतु तोही राजनर्तिकेला भेटायला अधीर झाला होता. तो राणीवर नव्हे तर राजनर्तिकेवर प्रेम करत होता.

राजनर्तिकेच्या रंगमहालात गुपचूप येऊन कोतवाल टोपीत लपवून आणलेले फळ राजनर्तिकेला देत म्हणाला, ''कोणीही असा स्वर्गीय ठेवा तुला आजवर भेट दिला नसेल. हे अमृताचे फळ आहे. ते खा आणि अजरामर हो.'' राजनर्तिकेने फळ घेतले. कोतवाल गडबडीने निघून गेला.

ही राजनर्तिका भृर्तहरी राजावर देव मानून मनोभावे प्रेम करीत होती. आपला राजा दीर्घायुषी व्हावा म्हणून तिने ते फळ भृर्तहरी राजाला जेव्हा दिले तेव्हा राजाला मोठे आश्चर्य वाटले. आपण आपल्या लाडक्या राणीला हे फळ दिले होते. तेच फळ राजनर्तिकेकडून परत आपल्याच हाती कसे आले याचा शोध घेण्यासाठी तो राणीच्या महालात गेला. त्याने राणीला प्रश्न केला, ''मी तुला जे अमृतफळ दिले होते, ते तू काय केलेस?''

''मी ते फळ खाल्ले !'' राणी खोटं बोलली. भृर्तहरी खूप निराश झाला. पत्नी धडधडीत खोटं बोलते म्हणजे माझा विश्वासघातच ! त्याने फळाचा प्रवास कसाकसा झाला ते शोधून काढले व या जगात हे मोहाचे आणि मायेचे मोहजाल आहे, ते भेदले पाहिजे; या संसाराचा व खोटेपणाचा तिरस्कार करून राजा भृर्तहरी निघून गेला. त्याने ते अमृतफळ स्वत: खाल्ले व दीर्घकाळ तपश्चर्या करण्याच्या हेतूने अरण्यात गेला.

भृर्तहरीने राजत्याग केल्यामुळे विक्रमराजाच्या राज्याला चालवणारा कोणी राहिला नाही. ही गोष्ट इंद्राला समजली व त्याने एका देवाला भूतलावर पाठवले आणि विक्रमराजाच्या राज्याचे रक्षण कर असे सांगितले. भृर्तहरी राज्य सोडून निघून गेल्याचे विक्रमराजाला समजले. तो धारानगरीकडे यायला निघाला. जेव्हा तो राज्याच्या सीमेवर आला तेव्हा अर्धी रात्र होऊन गेली होती. दूर वस्तीच्या घरातून मशालींचा उजेड दिसत होता. चौका-चौकातून पहारेकरी तलवारी पाजळत फिरत होते. विक्रमराजा एकटाच घोड्यावरून दौडत आला होता. पोटापुरता शिधा त्याने पाठीवर बांधून घेतला होता. कमरेला तलवार होती. कमरेला धोतराचा ओचा व अंगात अगदी साधा अंगरखा होता.



इंद्राने धारानगरीच्या रक्षणार्थ ठेवलेला देव विक्रम राजाला आडवा आला व त्याने प्रश्न केला, ''तू कोण आहेस ? कोठून आलास व कोठे जाणार आहेस?''

त्याला विक्रम राजाने प्रत्युत्तर केले की, ''मी राजा विक्रम असून हे माझे राज्य आहे. माझी वाट अडवणारा तू कोण आहेस ?''

''मी या राज्याचा रक्षक असून, इंद्रदेवाने माझी नियुक्ती केली आहे. तू तर म्हणतोस मी राजा विक्रम आहे. विक्रम राजाला मी पाहिले नसले तरी, तो खूप शूरवीर, न्यायी व धाडसी आहे म्हणे. तसा तर तू दिसत नाहीस आणि राजा असा चोरासारखा मध्यरात्रीचा एकटा येईल का? तूच सांग!'' देव म्हणाला.

''हो मी विक्रमच आहे आणि हे सिद्ध करण्यासाठी मी काय करावे हे तू सांग.''

‘‘माझ्याशी युद्ध कर.’’ म्हणत देवाने तलवार उपसली. विक्रमनेही आपली तलवार हातात घेतली व घोड्यावरून खाली उतरला. दोघांची लढाई जुंपली. तलवारींचा खणखणाट होऊ लागला. पहाटेपर्यंत ते डाव, प्रतिडाव करत राहिले. अखेर विक्रम राजाने त्याची तलवार उडवली. देव हरला. ‘‘राजा, मी तुला ओळखले. तू विक्रमच आहेस. तू खुशाल राज्य कर. मी परीक्षा घेतली. तू जिंकलास, हे राज्य तुझ्या स्वाधीन करत आहे.’’ देव म्हणाला.

‘‘माझेच राज्य मलाच देताना उपकारकर्त्यासारखा बोलतोस. गंमतच म्हणायची.’’ विक्रम हसून म्हणाला.

‘‘परिस्थितीच तशी आहे. तुझे राज्य बुडवण्यासाठी अनेक शत्रू तयार होत होते. त्यात दैविक व पैशाच्चिक बाबीही होत्या. एकाच दग्धविषारी नक्षत्र व मुहूर्तावर तीन व्यक्ती जन्मल्या. एक राजाच्या घरी, दुसरा तेल्याच्या घरी जन्माला आला आणि तिसरा कुंभाराच्या घरी वाढला. त्यापैकी राजाच्या घरी वाढलेला तू. तेल्याच्या घरी वाढला तो पाताळात गेला. परंतु कुंभाराने योग सामर्थ्यावर आपल्या मुलाला पिशाच्च बनवून झाडावर उलटे टांगले.’’

‘‘कशासाठी ?’’ विक्रमने विचारले.

‘‘वेताळाची मर्जी राहावी म्हणून ! हा वेताळ जर प्रसन्न झाला तर काहीच कमी पडत नाही. पण त्याचे प्रश्न अवघड असतात. त्याच्या प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात. बोलले की मौन भंग होतो; आणि नाही बोलावे तर डोक्याची छकले उडतात. प्रश्नांना उत्तर देणे भाग पडते; पण मौनभंग झाला म्हणून तो त्या प्रेतात लपून बसतो. ते प्रेत म्हणजेच पिशाच्च असून, त्यात वेताळ राहतो. ही सगळी योग सामर्थ्याची किमया आहे.’’ देव म्हणाला.

‘‘मीही योगसामर्थ्य शिकायला कैलास पर्वतावर गेलो होतो.’’

‘‘मग तूच वेताळच्या कटू प्रश्नांना उत्तरं दे आणि सावधपणे राज्य कर. मित्र कमी पण शत्रू जास्त अशी अवस्था झाली आहे.’’ असे सांगून देव स्वर्गाला निघून गेला.

राजा आपल्या महालात आला तेव्हा सूर्योदय होत होता. विक्रम राजा अशा शुभप्रभाती आलेला पाहून धारावासियांना आनंद झाला. ताबडतोब दरबार भरवण्यात आला व विक्रमराजाच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू झाली. दिवसभर सनई चौघडे वाजत राहिले. सर्व नगरजन स्वागत गीत गात फुले उधळत दरबारात हजेरी लावून जात होते. हळूहळू सर्व स्थिरावले. विक्रमराजा आता राज्यकारभार पाहू लागला. तो कर्तृत्ववान, ज्ञानी, न्यायी व शूर होता.

एके दिवशी दरबारात हास्यविनोद सुरू असताना व कलावंतांचे कौतुक होत असताना सत्शिल नावाचा योगी दरबारात प्रवेश करता झाला. त्याच्या हातात सफरचंदासारखे

लालभडक फळ होते. ते त्याने विक्रमाला दिले. विक्रमराजा त्याचे नाव, गाव व ख्यालीखुशाली विचारणार होता पण योगी थांबलाच नाही. तो आला तसाच तडक निघून गेला.

विक्रमराजाला पूर्वी देवाने सावध केले होते की, 'मित्र कमी व शत्रू फार अशी अवस्था झालेली आहे.' देवाचे हे शब्द आठवताच विक्रमाने एका शिपायाला बोलावले व हातातील फळ त्याच्याकडे देत म्हटले, हे फळ जपून ठेवा. भांडारपालाकडे द्या. योग्य वेळी तपासून घेऊ. फळ घेऊन शिपाई निघून गेला. परंतु तो योगी रोजच येऊ लागला व लालभडक फळ देऊन निघून जाऊ लागला. विक्रमाने एकदा त्याचा गुपचूपपणे पाठलाग करून तो योगी काय करतो हे पाहिले. तो योगी ध्यानस्थ बसलेला दिसे.

एकदा विक्रमराजा सैनिकांसह शिकारीला गेला असता, तो योगी तेथे प्रगट झाला व त्याने नेहमीप्रमाणे लाल फळ दिले आणि योगी डोळे मिटून एका पायावर उभा राहिला. त्याच्या अंगात भगवी कफनी, चेहऱ्यावर दाढी मिशांचे जंजाळ व काखेला झोळी असा त्याचा अवतार होता.

राजा त्या फळाशी चाळा करत असताना ते फळ खाली दगडावर पडले आणि फुटले. त्यातून चमकणारे एक रत्न बाहेर पडले. ते रत्नही लालभडक व देखणे होते. त्याचा लालसर प्रकाश पडला. सैनिकाने ते रत्न उचलून विक्रमाकडे दिले. विक्रम राजाने योग्याला विचारले, ''योगीराज दरवेळी हे रत्नयुक्त लाल फळ तुम्ही मला कोणत्या हेतूने देत राहिलात ?''

तेव्हा तो योगी स्थिर होऊन डोळे उघडून म्हणाला, ''राजन्, धर्मशास्त्रामध्ये असे लिहिले आहे की ज्योतिषी आणि वैद्याने कुठेही जाताना आपले पंचांग किंवा औषधे बरोबर न्यावीत. तद्वतच योग्यानेही आपले सामर्थ्य दाखवावे. तू या एकाच फळाबद्दल बोलतोस, पण दरवेळी मी तुला अशीच रत्ने दिली होती; पण तुझ्या मनात किंतु उत्पन्न झाला.''

विक्रम राजाला पश्चात्ताप झाला. जेव्हा तो शिकार आटोपून परत आला तेव्हा भांडारपालाकडून योग्याने दिलेली सर्व लाल फळे मागवून घेतली. ती फळे फोडली असता सर्वातून अनमोल रत्ने निघाली. योगी तेथे प्रगटला तेव्हा विक्रमाने विचारले, ''एवढी कृपा माझ्यावर का केलीत ?''

तेव्हा योगी बोलला, ''राजन, ही गोष्ट मी तुला एकांतात सांगेन.''

''योगीराज, आपण एवढी कृपा केलीत, पण एकदाही माझ्याबरोबर भोजन केले नाहीत. माझे आमंत्रण स्वीकारावे व भोजनास उपस्थित रहावे. मला आनंद वाटेल.''

योगी म्हणाला,‘ ‘राजन, भोजनाची मला गरज नाही. मी सिद्धयोगी सत्‌शिल आहे. मी गोदावरी नदीकाठी स्मशानात एक मंत्र सिद्ध करणार आहे. त्यामुळे मला अष्टसिद्धी प्राप्त होणार आहेत. परंतु सोबत म्हणून तुझ्यासारख्या ज्ञानी व शूरवीर माणसाची मला गरज आहे. तू रात्रभर माझ्याबरोबर राहा म्हणजे काही विघ्न येणार नाही.’’


योग्याचे बोलणे ऐकून विक्रमराजा त्याला साहाय्य करण्यास कबूल झाला. ‘‘योगीराज, तुमच्या सेवेला मी केव्हा उपस्थित व्हावे?’’ राजाने विचारले.

सत्‌शिल नावाचा तो योगी म्हणाला, ‘‘आजपासून येणाऱ्या पंधराव्या मंगळवारी अमावस्या आहे. त्यावेळी तू एकटाच तुझी तलवार घेऊन स्मशानात ये. मी तुला भेटेन व कार्य सांगेन. राजाकडून वचन घेऊन योगी निघून गेला.’’

म्हटल्याप्रमाणे पंधराव्या मंगळवारची अमावस्या आली. विक्रमराजा दिवस मावळत असतानाच गोदावरी काठी स्मशानात एकटाच पोहोचला. त्याने तलवार हाती घेतली होती. तंग तुमान घातली होती. अंगरख्याच्या आत कट्यार होती व कमरेला शेला बांधला होता. त्याच्या कानातील सुवर्ण कुंडले झळाळत होती.

सत्‌शिल योगी होम पेटवून भूत प्रेताला बोलवत होता. त्याच्याभोवती भुते नाचत होती. हडळी आपल्या केसांना गरागरा फिरवत होत्या. काही भुतं कवट्या बनून दातावर दात आपटून आवाज करत होती. विक्रमराजा त्या योग्यासमोर येऊन बसला. राजा अजिबात घाबरला नव्हता. त्याने योग्याला विचारले, ‘‘महाराज, काय आज्ञा आहे ?’’

योगी गंभीर होत म्हणाला, ‘‘बरं झालं तू आलास. येथून दोन कोसावर एक स्मशान आहे. तिथे मधोमध एक शिसवाचे झाड आहे. त्यावर एक प्रेत उलटे लटकत आहे. ते माझ्यापर्यंत घेऊन ये. तोपर्यंत मी येथे पूजा करतो.’’



विक्रमराजा त्या दोन कोसावरच्या स्मशानाकडे पायी निघाला. सर्वत्र काळोख होता. विचित्र आवाज येत होते. तरी दमदार पावले टाकत हातात तलवार घेऊन विक्रमराजा त्या

स्मशानात आला. शिसवाच्या झाडावर उलटे टांगलेले प्रेत त्याने खांद्यावर घेतले व पायाला बांधलेली दोरी त्याने तलवारीच्या घावाने तोडली. दोरी तोडताच ते प्रेत ओरडू लागले.

विक्रम राजाला वाटले हा जिवंत माणूस आहे. कदाचित् त्या कुंभारानेच हे प्रेत समजून जिवंत माणसाला उलटे टांगले असावे. राजाने ते प्रेत खाली ठेवताच ते प्रेत उडून पुन्हा झाडावर उलटे होऊन लटकत राहिले व हसू लागले.

राजा अजिबात घाबरला नाही. त्याने त्याला पुन्हा खांद्यावर घेतले तेव्हा ते प्रेत बोलू लागले, ''अरे, तू आहेस तरी कोण ? आणि मला कुठे घेऊन निघाला आहेस ?''

''मी राजा विक्रम असून, धारानगरी हे माझे राज्य आहे. एका योग्याला मंत्र सिद्ध करण्यासाठी तुझी गरज आहे; पण तू कोण आहेस?'' विक्रम राजाने विचारले.

''मूर्खा, मी भुतांचा राजा वेताळ आहे; पण तुझे साहस पाहून मी प्रसन्न झालो आहे. मी तुझ्याबरोबर एका अटीवर येईन. वाटेत मी तुला एक गोष्ट सांगेन. ती तू ऐकायची. मधे काही विचारायचे नाही. मौन धरायचे. मौन तोडलेस तर मी परत या झाडावर उलटा टांगून राहीन आणि माझ्या प्रश्नाचे जर तू उत्तर दिले नाहीस तर तुझ्या मस्तकाचे तुकडे तुकडे होतील. आहे कबूल ?''



विक्रमराजा क्षणभर विचारात पडला. पण लगेच म्हणाला – ''आहे कबूल !'' बस खांद्यावर आणि सांग तुझी गोष्ट ! विक्रम वेताळला खांद्यावर घेऊन स्मशानाकडे नघाला.

✦✦